**मे. सनफ्लॅग आयर्न एँण्ड स्टील कंपनी लिमिटेड (लोहाराडोंगरी आयर्न ओअर ब्लॉक), यांच्या गाव-लोहाराडोंगरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र येथील प्रस्तावित आयर्न ओअर खाणकामाचा प्रकल्प-१,४०,५९८ टन/वर्ष प्रकल्पाच्या उभारणी प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २३/०६/२०२२ |
| वेळ | : | दुपारी ०१:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. सनफ्लॅग आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड (लोहारडोंगरी आयर्न ओर ब्लॉक), लोहारडोंगरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. |

**प्रस्तावना:-**

मे. सनफ्लॅग आयर्न एँण्ड स्टील कंपनी लिमिटेड (लोहाराडोंगरी आयर्न ओअर ब्लॉक), गाव-लोहाराडोंगरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित आयर्न ओअर खाणकामाचा प्रकल्प-१,४०,५९८ टन/वर्ष प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयातील राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) यांनी दिनांक ०३/०९/२०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास टीओआर साठी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग बी-1 मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. सनफ्लॅग आयर्न एँण्ड स्टील कंपनी लिमिटेड (लोहाराडोंगरी आयर्न ओअर ब्लॉक), गाव-लोहाराडोंगरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित आयर्न ओअर खाणकामाचा प्रकल्प-१,४०,५९८टन/वर्ष प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०१/०४/२०२२ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २३ जून, २०२२ रोजी प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १९/०५/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई -४०० ०२२
४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर,
५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
६) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर,
८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर,
९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, ब्रम्हपुरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
१०) तहसीलदार, तहसील कार्यालय,ब्रम्हपुरी, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
११) ग्रामपंचायत कार्यालय, लोहाराडोंगरी, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
१२) ग्रामपंचायत कार्यालय, लोहाराडोंगरी, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
१३) ग्रामपंचायत कार्यालय, किटाळी, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
१४) ग्रामपंचायत कार्यालय, काचेपार, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,

१५) ग्रामपंचायत कार्यालय, बोदरा, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
१६) ग्रामपंचायत कार्यालय, आलेवाही, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर,
१७) ग्रामपंचायत कार्यालय, खारकाडा, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर
१८) ग्रामपंचायत कार्यालय, गंगासागर हेटी, तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपूर

वरिल अनुक्रमांक ६ ते १८ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३५/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डबल्युपीसी) पीएच/बी-२२०५३०-एफटीएस-०२५५ दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत २० सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विशालकुमार मेश्राम, अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-**

श्री कुंदालाल, स्थानिक रहिवाशी यांनी तलावाबाबत एक लेखी निवेदन दिले.

श्री रमेश यशवंत बैसारे, सरपंच, ग्रामपंचायत एकारा, तालुका इकारा, जिल्हा चंद्रपूरः- लेखी निवेदन सादर केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-**

**१) श्री सुधाकर मडावी, ग्रामपंचायत सदस्य, मेंढकी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा प्रकल्प सुरु करताना प्रकल्प परिसरातील ग्रामपंचायतीस कुठलीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. आठ दिवसांपूर्वी सदरहू प्रकल्पाच्या जनसुनावणीबाबत मेंडकी | |

| | | |
|---|---|---|
| | ग्रामपंचायतीस पत्र आले. आम्ही आक्षेप कसे नोंदवावे, कारण याबाबत आक्षेप नोंदविताना गावातील लोकांना विचारुनच आक्षेप नोंदवावे लागतात. | |
| २) | त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीस उपलब्ध करण्यात आलेला दस्तावेज हा इंग्रजीत होता. त्यामुळे ग्रामस्थांना प्रकल्पाची माहिती मिळाली नाही. येथे सादरीकरण मराठीत दाखविले. सादरीकरण करताना सर्व माहिती ही खूप घाईत सांगितली. उपस्थितांना ती समजली नाही. | |
| ३) | तरी आक्षेप नोंदविण्याची मुदत वाढवून मिळावी. | |
| ४) | येथे वन्यजीव अधिवास आहे. प्रकल्पामुळे त्यांच्या अधिवासावर परिणाम होऊन ते मानवी वस्तीत आले तर जीवीताला धोका आहे. याबाबत स्थानिकांना त्यांना समजेल अशा भाषेत माहिती द्यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या परिसरात वन्यजीव नाहीत. कारण बफर झोनचा अहवालही घेतलेला आहे. तरीही भारत सरकारच्या वन्यजीव मंडळाचे मत, अहवाल घेण्यात येईल व तो उपलब्ध करुन देण्यात येईल |
| ५) | आपण जे उत्खनन करुन फायदा घेणार आहात, त्यात लोहाराडोंगरी गावास व परिसरातील इतर गावांना किती वाटा मिळेल? त्याचेही स्पष्टीकरण देण्यात यावे. | |
| ६) | या प्रकल्पामुळे डोंगराखालील जलस्त्रोतावर निश्चितच परिणाम होईल.त्यामुळे परिसरात पाणी टंचाई जाणवेल. त्याबाबत उपाययोजना. याची माहिती देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, तलावाचे खोलीकरण करून पाण्याची व्यवस्था करून देऊ. |

**२) श्री रमेश यशवंत बैसारे, सरपंच, ग्रामपंचायत एकारा, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर:-**
**लेखी निवेदन वाचून दाखविले**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या उत्खननातून ग्रामपंचायत एकारा व इतर ग्रामपंचायत यांना किती प्रमाणात रोजगार मिळेल? | |

| | | |
|---|---|---|
| २) | येथील मजूरांना रोजगाराची अत्यंत आवश्यकता आहे. प्रत्येक गावात ५० मजूर धरले, तर ५०० मजूर होतात. त्यानुसार कंपनीने काम द्यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**३) श्री योगेश मढावी, लोहाराडोंगरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्हा गावकऱ्यांना कुलर, टॉवर देण्यात यावे | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| २) | गावात बोअरची सुविधा पाहिजे | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ३) | आमच्या गावातील कामगारांना कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावी. | प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |
| ४) | लोहारडोंगरी गावातील गंगासागर रोड कंपनीने विकसित करुन देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की परिसरातील रस्ते हे टप्याटप्याने विकसित करण्यात येतील. |

**४) मिस शालिनी मढावी, आशा वर्कर, कार्यरत-लोहाराडोंगरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कुटुंबातील एका व्यक्तीस काम न देता गावातील कुटुंबातील सर्व सदस्यांना काम देण्यात यावे. त्याचप्रमाणे आमच्या म्हणण्यांनुसारच काम मिळायला पाहिजे. | |
| २) | प्रकल्प सुरु झाल्यानंतर तेथील वन्यप्राणी हे गावात येऊन, घरात येऊन ग्रामस्थांवर हल्ला करतील. त्याविषयी उपाययोजना, याबाबत माहिती. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या परिसरात वन्यजीव नाहीत. कारण बफर झोनचा अहवालही घेतलेला आहे. तरीही भारत सरकारच्या वन्यजीव मंडळाचे मत, अहवाल घेण्यात येईल व तो उपलब्ध करुन देण्यात येईल |
| ३) | आमच्या गावातील डोंगरावर प्रकल्प सुरु होणार आहे. तरी आम्हांला ५०% वाटा पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. | |
| ४) | शिक्षणपात्रतेनुसारच प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ५) | प्रत्येक गावात कुपोषित मुलांसाठी अंगणवाडीची व्यवस्था केलेली आहे. मात्र लोहाराडोंगरी गावात का नाही? तर लोहारडोंगरीला जर मिनी अंगणवाडी होत नसेल, तर एखादी आशा वर्कर पाच हजार रुपयांच्या नोकरीवर ठेऊन मुले कुपोषणमुक्त व्हायला पाहिजे. याबाबतीत तोडगा काढायला पाहिजे. येथे एकही मुलं कुपोषित राहू नये. म्हणून त्यांना आहार दिला जातो किंवा घरीही अन्न शिजवता येते. ग्रामीण भागातील महिला या कामावर गेल्यावर मुलं कुपोषित राहून नये. त्यासाठी एका महिलेची आवश्यकता आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | आमच्या गावात एखादी व्यक्ती आजारी पडली तर त्यास दवाखान्यात नेण्यासाठी खुपच अडचण येते. त्यासाठी गंगासागर रस्ता त्वरित विकसित करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की परिसरातील रस्ते हे टप्याटप्याने विकसित करण्यात येतील. मात्र वनविभागाचे ना हरकत प्रमाणपत्र संबंधित ग्रामपंचायतीने मिळवून द्यायचे आहे. |
| ७) | आमचा डोंगरी भाग आहे व वन्यप्राण्यांचा वावर आहे. तर रात्रीसाठी येथे मोठा दिव्याची, सौरउर्जा दिव्याची सोय करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ८) | खाण उत्खनन सुरु झाल्यावर जर आमच्या गावाला व परिसरातील गावांना विस्थापित करण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही मान्य करणार नाही. आम्ही प्रचंड विरोध करु. | |
| ९) | खाण उत्खनन सुरु झाल्यानंतर प्रदूषणात वाढ होईल. त्यामुळे लोहाराडोंगारी गावातील व इतर गावातील मुले आजारी पडली तर त्याची जबाबदारी कंपनीने घ्यावी. | |

### ५) श्री पटवारी लक्ष्मण ढुंबरे, किटाळी ग्रामपंचायत सदस्य, ता.ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी २२/१०/२०१६ ला महाराष्ट्र शासनास कितारी ग्रामपंचायत परिसरातील रस्त्यांची कामे करण्यासाठी माझे निवेदन सादर केलेले होते. महाराष्ट्र शासनाने किताडी-बालापूर, | |

| | | |
|---|---|---|
| | किताडी-अलट, किताडी-लोहाराडोंगरी, कितारी-रामपूरी, येथील रस्तेबाबतची स्थिती कळविली. नागभीड पंचायत समिती, तालुका-नागभीड, मुरगा, आवळगाव बाजारपेठ हा रस्ता ठप्प आहे. तरी या रस्त्याची मंजूरी मिळावी ही विनंती. तरी शासनास विनंती आहे की आमची अडचण लक्षात घेऊन येथील रस्ते त्वरित करण्यात यावेत. | |

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

**६) श्री निळकंठ झोरे, माजी सरपंच, किटाळी ग्रामपंचायत, ता. ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लोहाराडोंगरी येथे खाण उत्खननासाठी येथे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. हा संपूर्ण ग्रामीण भाग असून परिसरातील लोक शिक्षित नाही. शेतीवर किंवा पोट भरेल एवढेच दुसरे काम करतात. खाण उत्खनन करताना येथील नैसर्गिक साधनांवर काही परिणाम होणार आहे का?चंद्रपूरचे तापमान वाढले असून त्याचा जीवनावर परिणाम होणार आहे. तसा परिणाम होणार का? | |
| २) | सदरहू लोहाराडोंगारी गाव हे जंगल प्रभावित क्षेत्रामध्ये असल्याने येथे वन्यप्राणी मोठया प्रमाणात आहे. डोंगरात खाण सुरु केल्यानंतर ते गावात येऊन येतील प्राण्यावर, माणसांवर हल्ला करतील. त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या परिसरात वन्यजीव नाहीत. कारण बफर झोनचा अहवालही घेतलेला आहे. तरीही भारत सरकारच्या वन्यजीव मंडळाचे मत, अहवाल घेण्यात येईल व तो उपलब्ध करुन देण्यात येईल |
| ३) | येथील शुध्द हवा खाणीमुळे खराब होईल. तर इतर नैसर्गिक साधनांवर काही परिणाम होईल का याचा अभ्यास करुनच खाण उत्खननाची पुढील कार्यवाही करण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| ४) | कंपनीत स्थानिक युवक, युवतींना रोजगाराची संधि देण्यात यावी. खाजगी कंपनी जरी असली तरी येथील खनिजे सरकारला जमा करत आहेत. त्यामुळे स्थानिकांवर अन्याय करु नये. स्थानिकांना कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावी. | प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |
| ५) | स्वातंत्र्य मिळून एवढे दिवस झाले, पण आम्हांला रस्ता नाही. ही आमची अधोगती आहे. आमचे गाव, माणसे रस्त्याला जोडलेले नाहीत. त्यामुळे येथील मुले शिक्षणासाठी दुसरीकडे ठेवावी लागतात. | |
| ६) | प्रकल्प राबविताना प्रकल्पात स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांनी संधि देण्यात यावी. येथील वनसंपदा ही आमची आहे. त्यावर आमचा ह्क्क आहे. म्हणून कंपनी व्यापार करुन निघून गेली हे चालणार नाही. | |
| ७) | आमच्या परिसरात खाण उत्खनन केल्यानंतर कंपनीला, सरकारला जे लाभ मिळणार, तेवढाच लाभ येथील परिसर व लोकांना मिळालाच पाहिजे. | |
| ८) | शेती ही आमची पिढ्यानुपिढ्या उपजिविकेचे साधन आहे. त्यावर या खाणीचा परिणाम होऊ नये. त्याचप्रमाणे येथील वनसंपदा, वन्यजीव, पशूपक्षी यावर खाण उत्खनानाच दुष्परिणाम होऊ नये. | शेतीवर दुष्परिणाम होणार नाही. |

**७) श्री प्रमोद नागापुरे, तंटामुक्ती अध्यक्ष, गिटारी, जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पास माझा नकार/विरोध आहे, कारण या प्रकल्पामुळे खूप नुकसान आहे. उन्हाळ्यात येथील तलावाचे पाणी हे पूर्णपणे आटून जाते. टेकडीच्या खाली जो तलाव आहे, त्या तलावात टेकडीवरील झ-यांचे पाणी जात असते. येथील वन्यजीव हे कुठल्याही मोसमात | तलावाचे खोलीकरण करण्यात येऊन तेथे पाण्याची व्यवस्था करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | पाणी पिण्यास येथेच येतात. खाण झाल्यावर टेकडीखालील तलावात पाणी येणारा नाही, त्यामुळे वन्यजीवांना व शेतीला पाणी मिळणार नाही. ते तलाव एवढे खोल नाहीत की तेथे पाण्याची वर्षभराची साठवण होईल. | |
| २) | मला असे समजले की येथून फक्त कच्चा माल घेतला जाईल व पुढील क्रिया ही दुसरीकडे होईल. त्यामुळे आपल्या गावातील बेरोजगारांना जरी ते सुशिक्षित असले तरी रोजगाराची संधि मिळेल. शिवाय आता सर्व प्रकल्पात आधुनिक यंत्रणा वापरली जाते. | |
| ३) | प्रकल्पातील ब्लास्टींगमुळे त्रास हा होणारच आहे. तरी माझा या प्रकल्पाला विरोध आहे. | प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येणार आहे, त्यामुळे स्थानिकांना त्रास होणार नाही. |

**८) श्री धनराज मडावी, राहणार-लोहाराडोंगरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे उपस्थितांनी प्रकल्पाविषयी बरेच प्रश्न विचारलेले आहेत. मात्र स्थानिकांना हा प्रकल्प हवा आहे. कारण गावातील बेरोजगारांना रोजगाराची संधि मिळेल. मात्र प्रकल्प व्यवस्थापनाने प्रदूषण न होण्याची काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे परिसरातील गावात जे मजूर आहेत, त्यांना काम देण्यात यावे. आता प्रकल्पात ब्लास्टींग होणारच आहे. त्या सर्वांची काळजी घेण्यात यावी. हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु व्हावा ही अपेक्षा. | प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येणार आहे, त्यामुळे स्थानिकांना त्रास होणार नाही. |

९) **एका उपस्थितांनी सूचना केली की** या ग्रामपंचायतीत तीन गावे आहेत. ही गट ग्रामपंचायत आहे, तर एकट्या लोहा-याचा विचार न करता इतर गावांचाही विचार व्हावा. जेव्हा हा प्रकल्प सुरु होईल, तेव्हा तलावाचे खोलीकरण व ज्या वाया येतात, त्यांचा विचार करावा, नंतर विचार करावा प्रकल्प सुरु करावा की नाही. जर हा प्रकल्प येथे सुरु झाला व येथेच कंपनी सुरु झाली, तर प्रत्येक कुटुंबातील एकाला नोकरी मिळू शकते. तरी लवकारात लवकर प्रकल्प सुरु व्हावा.

१०) श्री जयंत विनायक झोरे, किटाळी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूरः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात शैक्षणिक अहर्तेनुसार नोकरी देण्यात यावी. ज्याची शैक्षणिक अहर्ता जसी जास्त, त्याप्रमाणेच नोकरी देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | सदरहू प्रकल्पाचा शेतीवर काय दुष्परिणाम होईल त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | शेतीवर दुष्परिणाम होणार नाही. |

११) श्री सुधाकर मडावी:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जेथे हा प्रकल्प उभारणार आहात, तेथील मोठ्या प्रमाणात झाडे तुटणार आहेत. तर जेवढी झाडे तुटणार आहेत, त्या त्या झाडाचे वय काढून तो मोबदला त्या ग्रामसभेला किंवा ग्रामपंचायतीला मिळाला पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | उत्खनन केलेला माल आपण कोठे नेणार? मला असे समजले की हा प्रकल्प फक्त पाच वर्षेच चालणार आहे. आपण आपला नफा कमवून जाणार, तर पाच वर्षांनंतर पुढे काय? याचा विचार कंपनीने करावा. | खाणीचे वय हे १५ वर्षाचे आहे. |

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१२) श्री प्रमोद रघुनाथ चिमुरकर, माजी सदस्य, जिल्हा परिषद चंद्रपूरः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत ब-याच स्थानिकांना आपल्यासमोर विषय मांडले. जरी आपण पर्यावरणीय जनसुनावणी आयोजित केलेली आहे, तरीही येथील स्थानिकांना वाटले की इतरही विषय असावेत. मात्र जे इतर विषय घेतले, तेही नमुद करावेत, कारण त्यांच्या मागण्यात सत्य आहे. तर इतर सूचनांवर जनसुनावणी होणार का? | अध्यक्ष यांनी सांगितले सदरहू जाहिर जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक आहे. त्याचबरोबर इतर विषयांची नोंद घेण्यात आलेली आहे. या समितीस प्रकल्प मंजूर करण्याचा, शिफारस करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार नाही. ही जनसुनावणी जनतेच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून ते शासनास कळविण्यात येतात. प्रकल्पास शासनस्तरावर मान्यता मिळत असते. |
| २) | खाण उत्खननामुळे गावपरिसारातील वातावरण दूषित होणार. त्याचा स्थानिक लोकांच्या आरोग्यावर परिणाम होणार. तरी परिसरातील ग्रामपंचायतीतील लोकांना मोफत वैदकीय उपचार देण्यात यावेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | उत्खनन करताना गावात प्रचंड आवाज येईल. तसेच रस्त्याच्या सीमा संपलेल्या असून रस्ते विकसित करणे आवश्यक आहे. ब्रम्हपुरीपर्यंतची कामे झालेली आहेत. रस्ते चांगले असले तर वाहनांचा आवाजही कमी येतो. वाहनांचा एकाच मार्गावर भर पडू नये. | प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येणार आहे. |
| ४) | परिसरातील सर्व गावांतील लोकांची मागणी आहे की लोकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. त्यांची मागणी आहे की प्रत्येक घरातील एका व्यक्तीला, प्रत्येक घरातील सर्वांनाच रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. तरी येथील लोकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |
| ५) | प्रकल्पातील ५% रॉयल्टी ही दिली जाते, ती परिसरातील पिण्याच्या पाणी योजनेसाठी, रस्त्यांसाठी वापरण्यात यावी. या गट | |

| | | |
|---|---|---|
| | ग्रामपंचायतीशिवाय दुसरीकडे ती रॉयल्टी वापरात येऊ नये. | |
| ६) | डोंगरीचा भाग हा गावालगत आहे. जरी आता लहान असला तरी पुढे त्याची व्याप्ती मोठी होणार आहे. तरी डोंगरी भागाचे उत्खनन विशिष्ट कालावधीपर्यंतच करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ७) | गावाच्या विकासासाठी कंपनीबरोबर सर्व करार करण्यात यावे. सर्व गावे एकमेकांशी जोडणारे रस्ते विकसित करण्यात यावेत. तसेच या प्रकल्पाला मान्यता देताना स्थानिक जनतेला न्याय द्यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की परिसरातील रस्ते हे टप्याटप्याने विकसित करण्यात येतील. मात्र वनविभागाचे ना हरकत प्रमाणपत्र संबंधित ग्रामपंचायतीने मिळवून द्यायचे आहे. |

समन्वयक यांनी प्रकल्प प्रवर्तक यांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांना उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बैठकीत तलावाच्या खोलीकरणाची मागणी करण्यात आली. तर प्रकल्प प्रवर्तक तलावात उत्खनन करुन खोलीकरण करुन पाण्याची व्यवस्था करुन देऊ.

येथे रस्ता तयार करण्याबाबत सूचना आल्या. तर रस्ता आम्ही तयार करुन देऊ. मात्र वनविभागाची परवानगी आवश्यक असल्यास ना हरकत प्रमाणपत्र हे संबधित ग्रामपंचायतीने/संबंधित व्यक्तीने आणून द्यावे. सीएसआरच्या माध्यमातून या गोष्टी करुन देण्यात येतील.

बैठकीत मुद्दा उपस्थित झाला की ब्लास्टींगमुळे काय होईल? तर १९५५ च्या कायद्यानुसार कंट्रोल ब्लास्टींगचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे गावातील कच्च्या घरांना वा पक्क्या घरांना त्रास होणार नाही. याबाबत शास्त्रीय अहवाल तयार करण्यात येईल.

पुढे मुद्दा उपस्थित करण्यात आला की मायनिंगमुळे शेतीवर काय दुष्परिणाम होणार आहेत? ही माईन्स सुरु होणार आहे ३१५ एमआरएम ते २४१ एमआरएम. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की येथील ग्राऊंड वॉटर टेबल हे २३५ च्या खाली आहे. त्यामुळे शेतीवर दुष्परिणाम होणार नाही किंवा भूगर्भातील पाण्यावर परिणाम होणार नाही.

चर्चेत या खाणीचे आयुष्य हे पाच वर्षे असे सांगितले. तर ते खरे नाही. या खाणीचे आयुष्य हे पंधरा वर्षाचे आहे. ते वाढू शकते, कारण ३५.७३ हेक्टर क्षेत्र आहे. १९ हेक्टरचे Exploration झाले, मात्र २३ हेक्टरचे झालेले नाही. त्यामुळे याचे आयुष्य हे १५-३० वर्षाचे होऊ शकते.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात रोजगारासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रकल्पात शैक्षणिक अहर्ता लक्षात घेऊनच रोजगार देण्यात येईल. येथे कंट्रोल ब्लास्टींगमुळे आवाज होणार नाही. रसत्याचा विकास हा मात्र टप्याटप्याने करण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या परिसरात वन्यजीव नाहीत. TATR अंधारी व घोडाझरी बफर झोनचा अहवालही घेतलेला आहे. तरीही भारत सरकारच्या वन्यजीव मंडळाचे मत, अहवाल घेण्यात येईल व तो उपलब्ध करुन देण्यात येईल.

उपस्थितांपैकी काहीनी मराठी प्रत देण्याची मागणी केलली होती. ती प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल.

वैदकीय सेवा निश्चतपणे पुरविण्यात येतील. त्यांनी सांगितले की येथे आम्ही कोणाचीही जमिन घेणार नाही. रस्त्यासाठी फक्त दोन हेक्टर वनविभागाकडून जमीन घेतलेली आहे. ३६ हे. लीज एरिया जमीन यवतमाळ जिल्ह्यामध्ये घेतली असून ती वन विभागाला हस्तांरीत करू. यवतमाळला घेतील. तेथेही तीस हजार झाडे लावणार आहोत.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की हा प्रकल्प सुरु झाला तर शासनास वर्षाकाठी ६५ कोटी रुपये मिळतील. आम्ही ३२ लोक कायम स्वरुपी घेऊ व अप्रत्यक्ष १५० लोक घेऊ. त्याचप्रमाणे कंपनीतील कंत्राटे-कॅन्टीन, बागबगीचा देखभाल याबाबत कराराने स्थानिकांना घेता येईल.

**१३) श्री अतुल सातफळे, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पातील वाहतुकीमुळे आजूबाजूच्या शेतीवर धुळ उडते, तर धुळीचा परिणाम रोखण्यासाठी उपाययोजना. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आम्ही गावातील रस्ता वापरणार नाही. आम्ही वनविभागाकडून दुसरा रस्ता घेतलेला आहे. फक्त १२ टनचे छोटे ट्रक्समधून वाहतुक करण्यात येईल. ट्रक ओव्हरलोड होणार नाही व मेनरोडपर्यत पाणी शिंपडण्यात येईल. ट्रक टार्पोलिनने बंद करुनच पाठविण्यात येईल. |

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की खाणीतील डिपॉझिट हे दक्षिणेला आहे. गावाच्या बाजूस येणार नाही

प्रकल्पाचे प्रवर्तक यांनी सांगितले की सनफ्लॅग ही कंपनी भंडाऱ्याला २०० हेक्टरमध्ये आहे. कंपनीच्या सभोवताल दाट जंगल तयार केलेले आहे. दरवर्षी वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करण्यात येते.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पारित केलेल्या मानकांच्या आतच आमच्या कारखान्याची प्रदूषण पातळी असते. नसल्यास आम्हाला दंड भरावा लागतो व प्रसंगी, कंपनी बंद करण्यात येते.

प्रकल्पाच्या उप-कार्यकारी संचालक यांनी सांगितले बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्याशिवाय जर स्थानिक लोक लघु-उद्योग विकसित करणार असतील, तर त्यास पूर्णपणे सहकार्य करण्यात येईल. परिसराचा सामाजिक आर्थिक विकास करण्याचा आम्ही निश्चितच प्रयत्न करु.

समन्वयक यांनी अध्यक्षांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की आज आपण मे. सनफ्लॅग आयर्न एँण्ड स्टील कंपनी लिमिटेड (लोहाराडोंगरी आयर्न ओअर ब्लॉक), गाव-लोहाराडोंगरी, तालुका-ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित आयर्न ओअर खाणकामाचा प्रकल्प-१४०५९८ टन/वर्ष प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी जमलो आहोत. सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही.

त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले २० सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)** | **(अ. मा. करे)** | **(विशालकुमार मेश्राम)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |